# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/09/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

दिनांक 24/09/2020 ला ठाणेदार सपोनि श्री. सुरेश मटटामी, पोलिस स्टेशन केळवद यांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन पांढुर्णा ते नागपूर या मार्गाने एका टाटा सफारी वाहनात काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करत आहे. अशा खबरेवरून सपोनि श्री. सुरेश मटटामी हे पो.स्टे केळवद स्टाफसह पांढुर्णा ते नागपुर हायवे कमांक 47 वरील सावळी फाटयाजवळ नाकाबंदी लावली. दरम्यान 05:00 वा. एक टाटा सफारी क. एम. एच. 31/झेड – 7576 हे वाहन येतांना दिसले. तेव्हा सदर वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन नाकाबंदीचे ठिकाणी न थांबविता नागपूरचे दिशेने बेदरकारपणे पळवु लागल्याने त्याचा पाठलाग करीत असतांना वाहन चालकाने आपले वाहन हायवे कमांक 47 ने उमरी, बिहाडा फाटयावरून पाटणसावंगी टोल नाक्याच्या दिशेने पळवु लागला. पाटणसावंगी टोल नाक्या समोर काही वाहन उभे असल्याने सदर वाहनचालकाने त्या ठिकाणी आपले वाहन थांबविले. तेव्हा चालकाचा साथीदार वाहन सोडुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. वाहनाची पाहणी केली असता त्यात एक इसम बसलेला दिसला व वाहनाचे पाठी मागिल डाल्यात गोवंश जातीचे जनावर कोंबुन भरलेले दिसले. सदर टाटा सफारी क. एम. एच. 31/झेड – 7576 चे चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आरोपी क्र. 1) मो. शाकीफ मो. शिराजअद्दीन शेख, वय 20 वर्ष, रा. टेका नाका नागपूर असे सांगितले. तसेच पळुन जाणाऱ्या आरोपीचे साथीदार चे नाव इरशाद अहमद शेख, वय 21 वर्ष, रा. टेका नाका नागपूर असे सांगितले. नमुद टाटा सफारी वाहनामध्ये एकुन 6 गोवंश गायी व 1 गोरा असे एकुण 7 जनावरे असे एकुण कि. 68,0000/–रू. चे जनावर क्रुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीच्या ताब्यातुन जनावरे व वाहन टाटा सफारी किमंत 5,00,000/– रूपये असा एकुण 5,68,000/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन केळवद येथे कलम 279, 34 भादवी, सहकलम 11(1),(घ)(ड)(च) प्रा.नि.वाग.प्र. अधि.1960 सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 179, 192(अ) मोवाका सहकलम 119 महा.पोलीस कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एक आरोपीला अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास सपोनि श्री. सुरेश मटटामी हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती मोनिका राउत, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री सुरेश मटटामी, नापोशी रविन्द्र चटप, पोशी सचिन येलकर, अरविंद ठाकरे, राणासिंग ठाकुर व चालक नापोशि गुणवंता डाखोळे व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर